महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २६६ वे दिनांक : २२/०९/२०२६ वार : मंगळवार

## बिहारच्या प्रकारावर रोहिणी खडसेंचा संताप; 'अंधभक्त उद्या झोंबी बनतील'



**पुणे :** बिहारच्या जमुई जिल्ह्यात एका दुचाकीवरून जाणाऱ्या तरुण-तरुणीला रस्त्यात अडवून काही समाजकंटकांनी त्यांच्याशी असभ्य वर्तन आणि छेडछाड केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर सर्वत्र तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या संतापजनक प्रकारावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली असून, ही अंधभक्तांची जमात आहे, ही जमात फोफावत चालली आहे, अशी कडक शब्दांत टीका केली आहे. या घटनेचा निषेध करताना रोहिणी खडसे यांनी आपल्या सोशल मीडिया हँडलवरून आपले मत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, बिहारमधील हा व्हिडिओ प्रचंड मन हेलावून टाकणारा आणि त्यासोबतच चीड आणणारा आहे. दहावीत शिकणाऱ्या मुलीचा या तथाकथित 'संस्कृती रक्षकांनी' अक्षरशः विनयभंग केला आहे. या घटनेने महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, अशा प्रवृत्तींविरोधात कठोर कारवाईची मागणी केली जात आहे. रोहिणी खडसे यांनी महाराष्ट्रातील एका घटनेविषयी सांगितले की, असाच एक प्रकार महाराष्ट्रातही मागे घडला होता. 8 वर्षांच्या चिमूरडी सिंहगडावर बरमुडा घालून पर्यटनासाठी याआली होती म्हणून तथाकथित संस्कृती रक्षकांनी तिच्या वडिलांसोबत वाद घातला आणि त्यांना मारहाण केली होती. पुढे रोहिणी खडसे म्हणाल्या, ही अंधभक्तांची जमात आहे, ही जमात फोफावत चालली आहे, त्यांना कोण प्रोत्साहन देत आहे? यांना कायद्याची भीती राहिली नाही का? शासनाने यांच्यावर जरा कारवाईचा बडगा उगारावा नाहीतर हे अंधभक्त उद्या झोंबी बनतील आणि सरकारमधील लोकांनाच आपले लक्ष करतील, अशी भीती देखील खडसे यांनी व्यक्त केली आहे. बिहारमधील जमुई जिल्ह्यात एका अल्पवयीन मुलीची आणि तिच्या साथीदाराची छेड काढणे, त्यांना मारहाण करणे तसेच मुलीचा विनयभंग करण्याच्या धक्कादायक प्रकाराची राष्ट्रीय महिला आयोगाने स्वतःहून (सुओ मोटो) गंभीर दखल घेतली आहे. याप्रकरणी आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी बिहारच्या पोलीस महासंचालकांना थेट पत्र लिहून तातडीने एफआयआर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, व्हायरल झालेल्या व्हिडिओ फुटेजच्या आधारे सर्व आरोपींची ओळख पटवून त्यांना अटक करावी आणि या प्रकरणाची निश्चित कालमर्यादेत निष्पक्षपणे चौकशी करावी, असे कडक निर्देशही महिला आयोगाने दिले आहेत. जमुईच्या या संतापजनक घटनेला स्थानिक पोलिसांनीही दुजोरा दिला आहे. जमुईचे पोलिस अधीक्षक विश्वजीत दयाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीच्या जबाबानुसार ही घटना 19 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7 वाजण्याच्या सुमारास घडली आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये साधारण 6 ते 7 लोक दिसत असून, त्यापैकी काहींची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत एफआयआर दाखल केला असून, आतापर्यंत तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींचाही शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## IIT बॉम्बे आत्महत्या प्रकरणात प्राध्यापक निलंबित

**मुंबई :** आयआयटी बॉम्बेने बीटेक विद्यार्थी साहिल वाकोडे यांच्या मृत्यूप्रकरणी प्राध्यापक सूर्यनारायण दुल्ला यांना डीन पदावरून निलंबित केले आहे. तसेच, साहिल यांच्या मृत्यूबाबत यापूर्वी केलेल्या वक्तव्यांसाठी संस्थेने माफीही मागितली आहे. आयआयटी बॉम्बेने म्हटले आहे की, साहिल यांच्या मृत्यूपूर्वी नेमके काय घडले होते, याची चौकशी पूर्ण होण्यापूर्वी काहीही सांगणे योग्य नव्हते. २२ वर्षीय साहिल हे आयआयटी बॉम्बेच्या एनर्जी सायन्स अँड इंजिनीअरिंग विभागातील द्वितीय वर्षाचे विद्यार्थी होते. १८ सप्टेंबरच्या रात्री पवई कॅम्पसमधील वसतिगृहाच्या खोलीत ते मृतावस्थेत आढळले होते.आयआयटी बॉम्बेने १९ सप्टेंबर रोजी आपल्या अधिकृत निवेदनात म्हटले होते की, घटनेच्या दिवशी साहिल यांना मिड-सेमिस्टर परीक्षेदरम्यान फोन वापरताना पकडण्यात आले होते. संस्थेने दावा केला होता की, साहिल यांनी ChatGPT वर प्रश्नपत्रिका अपलोड करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर वसतिगृहात जाऊन त्यांनी आत्महत्या केली. *यावर्षी IIT बॉम्बेमधील आत्महत्येची ही तिसरी आणि देशातील नववी घटना आहे. गेल्या 6 वर्षांच्या कालावधीत 2025 मध्ये सर्वाधिक 16 IIT विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली होती. ग्लोबल IIT माजी विद्यार्थी सपोर्ट ग्रुपनुसार, गेल्या 20 वर्षांत IITच्या एकूण 160 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे.* IIT बॉम्बेने संचालक प्रा. शिरीष केदारे यांच्या राजीनाम्याबाबतही स्पष्टीकरण दिले. संस्थेने सोमवारी निवेदन जारी करून सांगितले की, संचालकांनी राजीनामा दिलेला नाही. राजीनाम्याच्या मुद्द्यावर IIT बॉम्बेच्या मंडळाची सोमवारी बैठक होणार आहे.

## शासकीय भरती प्रक्रिया होणार पारदर्शक: टास्क फोर्सच्या शिफारशी




**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील शासकीय भरती परीक्षा प्रक्रिया पारदर्शक, गुणवत्तापूर्ण, विश्वासार्ह आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी शासनाला समिती शिफारशी सादर करेल. परीक्षा वेळापत्रक, प्रश्नपत्रिकेचा दर्जा, परीक्षा केंद्रे, पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण, पेपर तपासणी, सामान्यीकरण, निकाल, न्यायालयीन प्रकरणे आणि नियुक्ती प्रक्रिया अशा विविध मुद्यांचा अभ्यास करून ह्या शिफारशी समिती सुचवेल, अशी माहिती भरती परीक्षा उच्चस्तरीय टास्क फोर्सच्या अध्यक्षा तथा सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी दिली.भरती परीक्षा सुधारण्यासाठी गठित उच्चस्तरीय समितीने छत्रपती संभाजीनगर विभागातील विद्यार्थ्यांशी स्मार्ट सिटी कार्यालयात संवाद साधल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी समितीचे सदस्य तथा पोलिस महासंचालक सदानंद दाते, सदस्य सचिव तथा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि सदस्य तथा नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम उपस्थित होते.श्रीमती व्ही. राधा यांनी पत्रकारांना माहिती दिली की, समितीने आतापर्यंत पुणे, नागपूर आणि अमरावती येथे विद्यार्थी व उमेदवारांशी संवाद साधला आहे. पुण्यात सुमारे 600, नागपुरात 350 आणि अमरावतीत 800, अशा सुमारे 1 हजार 750 विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. तसेच समितीला 20 हजारांहून अधिक ई-मेल प्राप्त झाले असून, समितीने दिलेल्या ई-मेलवर 1 हजार 400 हून अधिक जणांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून निवेदने दिली आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखतींचे निश्चित वेळापत्रक असावे, अशी प्रमुख मागणी केली आहे.रीक्षा पद्धतीत सातत्य असावे आणि बदल आवश्यक असल्यास उमेदवारांना पुरेसा अवधी द्यावा, एकदाच नोंदणी व शुल्क आकारणी करावी, प्रश्नपत्रिकेचा दर्जा, उत्तरतालिका आणि पेपर तपासणी अधिक पारदर्शक असावी, अशा सूचना विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. परीक्षा केंद्रांसाठी किमान सुविधा व निकष, पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण, निकाल व नियुक्ती प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे, तसेच एमपीएससीशी संबंधित न्यायालयीन प्रकरणे आणि भरती प्रक्रियेतील अडचणींचाही अभ्यास करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत.परीक्षा ऑनलाइन किंवा ऑफलाइन कोणत्याही पद्धतीने घेतली तरी गैरप्रकारांना प्रतिबंध करणारी सुरक्षित व्यवस्था असावी. प्रश्नपत्रिका गळती रोखण्यासाठी विविध राज्ये आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पद्धतींचा अभ्यास केला जाईल. परीक्षा केंद्रांसाठी किमान सुविधा, पर्यवेक्षकांची निवड व प्रशिक्षण, प्रश्नपत्रिका वितरण आणि परीक्षा संचालनासाठी प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्याबाबतही विचार करण्यात येणार आहे. विविध सत्रांतील परीक्षांसाठी सामान्यीकरणाची पद्धत स्पष्ट असावी, यासाठी संबंधित संस्थांच्या पद्धतींचा अभ्यास केला जाईल.परीक्षा रद्द करण्याची परिस्थिती निर्माण झाल्यास त्यासाठी स्पष्ट कार्यपद्धती असावी आणि निवड झालेल्या उमेदवारांचे हित सुरक्षित राहावे, याचाही विचार केला जाणार आहे. निकाल, प्रतीक्षा यादी आणि नियुक्त्या वेळेत पूर्ण करण्यासोबतच परीक्षा प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी उपाययोजनांचा अभ्यास केला जाईल. परीक्षा वेळेत न झाल्यामुळे वयोमर्यादेच्या दृष्टीने उमेदवारांचे नुकसान होत असल्यास त्याबाबतही विचार करण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२६


## कन्नड तालुक्यात दुष्काळ जाहीर करुन भरपाई द्या



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत करण्याची मागणी कन्नड तालुका संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी, तहसीलदार कन्नड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,कन्नड तालुक्यात तुरळक ठिकाणी अत्यंत अल्प पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांचे कापशी, मका, सोयाबीन, तूर, बाजरी व इतर पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. बियाण्यांचे वाढलेले भाव, खतांच्या वाढलेल्या किंमती व शेती मशागतीसाठी लागणारा खर्च शेतकऱ्यांचा पूर्णपणे झाला असून, कापशीला पाते व कैरी लागू शकली नाही. तर काही प्रमाणात मका हिरवी दिसत असली तरी पूर्णपणे मका पिकाला लागलेले मकाचे कणसाला दाने भरलेले नाहीत. अशा बिकट परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांना झालेला खर्च गृहीत धरून हेक्टरी पन्नास हजार रु. सरसकट मदत करावी.तसेच सद्यस्थितीत पिककापणी प्रयोग सोडता पिकविम्याची निकष बदल्यामुळे व जिल्हाधिकारी यांचे पिकविम्याचे अधिकार काढल्यामुळे, शेतकऱ्यांना गारपीट, वादळ, पावसाचा खंडामुळे बाधित होणारी पिकांना मदत करता येत नाही. व पिकविमा भरलेल्या शेतकऱ्यांना देखील मदत न मिळता पिकविमा कंपनीचा मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ पूर्वीप्रमाणे नियम करून पिकविमा भरलेल्या शेतकऱ्यांना पिकविम्याचा लाभ घ्यावा.तसेच पावसाची नोंद करण्याची पर्जन्यमानयंत्र मंडळ निहाय जी नोंद होते ती गावनिहाय पर्जन्यमान यंत्र बसवावे. लहरी पावसामुळे गावातील एका शिवारात पाऊस पडतो तर त्याच गावातील दुसऱ्या शिवारात पाऊस पडत नाही. त्यामुळे वीस ते बावीस गावांच्या महसूल मंडळात पर्जन्यमान यंत्राऐवजी गावनिहाय पावसाची नोंद घ्यावी. जेणेकरून शेतकऱ्यांना न्याय मिळेल.ट्रिगर 1 यादीत कन्नड तालुका न आल्यामुळे शेतकरी चिंतेत आहे. तरी याबाबतीत विनाविलंब शासनाला परिस्थिती कळवून कन्नड तालुक्यात दुष्काळ घोषित करून शेतकऱ्यांना दुष्काळाच्या सुविधा तात्काळ द्याव्यात. अशी मागणी तालुका संघर्ष समिती चे अध्यक्ष तथा जि.प. मा.अध्यक्ष डॉ. आण्णासाहेब शिंदे, गणेश पवार, दिनकर दाभाडे, रोहन पवार, किसन पवार, सुदाम बोरसे, भारत साळुंखे, प्रभाकर जाधव आदींनी केली आहे.

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी विठ्ठल अनमुलवाड यांची निवड

**पूर्णा :** महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी येथील अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळा, कौशल्यानगर पूर्णा येथील शिक्षक विठ्ठल जयवंत अनमुलवाड यांची निवड झाली आहे. पुरस्कारासाठी निवड झालेल्या आदर्श शाळा व आदर्श शिक्षकांची यादी पुणे येथे जाहीर करण्यात आली.परभणी जिल्ह्यातून माध्यमिक व प्राथमिक विभागातील प्रत्येकी एका शिक्षकाची या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाली आहे. प्राथमिक विभागातून विठ्ठल अनमुलवाड यांच्या नावाचा समावेश आहे. अनमुलवाड यांनी अध्यापनासोबत विविध नाविन्यपूर्ण व विद्यार्थी-केंद्रित शैक्षणिक उपक्रम राबविले आहेत. प्रयोगाधारित अध्यापन, वाचन संस्कृती, तंत्रज्ञानाचा शैक्षणिक वापर, विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेण्यात आली आहे.अनमुलवाड यांच्या निवडीबद्दल शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष आनंद अजमेरा, माजी मुख्याध्यापक हिराजी भोसले, विजय लोणीकर, दिलीप माने, सत्यनारायण रणवीर, निर्मला रेड्डी, रमेश सूर्यवंशी तसेच शाळेतील सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.उपक्रमशील शिक्षक म्हणून ओळखअनमुलवाड यांनी विद्यार्थ्यांना कृतीतून व अनुभवातून शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. शाळेतील विविध शैक्षणिक, वाचन, प्रयोगाधारित तसेच विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

## अमली पदार्थांच्या विळख्यातून बीडला मुक्त करणार; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा कठोर पवित्रा!




**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्ह्यात अमली पदार्थांच्या वाढत्या वापराला आळा घालण्यासाठी आणि क्षेत्रीय स्तरावरील ही समस्या समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अमली पदार्थ प्रतिबंधात्मक समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय यंत्रणेला अमली पदार्थांच्या विरोधात १०० टक्के कडक कारवाया करण्याचे आदेश दिले असून, व्यसनमुक्तीसाठी संबंधित यंत्रणेने आता पूर्णपणे 'अ‍ॅक्शन मोड'वर येणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले.बैठकीच्या सुरुवातीला बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी 'कोटपा' (COTPA) कायद्यांतर्गत जिल्ह्यात जास्तीत जास्त कारवाया करून अमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्याच्या सूचना दिल्या. विशेषतः माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले.मुख्याध्यापक आणि शिक्षणाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाचीशासन निर्णयाचा संदर्भ देत जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, १० जुलै २०२३ च्या आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व केंद्रप्रमुख, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी आणि मुख्याध्यापकांना अमली पदार्थ तसेच तंबाखू विरोधी कारवाया करण्याचे अधिकार व सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता केवळ प्रशासनावर भिस्त न ठेवता, मुख्याध्यापकांनीदेखील या समाजसुधारणेच्या कामात हिरिरीने पुढे यावे. विद्यार्थ्यांना व्यसनाधीन बनवणाऱ्या प्रत्येक समाजकंटकाविरुद्ध एकजूट होऊन सक्त कायदेशीर कारवाया करण्याचे निर्देश त्यांनी दिले.अमली पदार्थांचे सेवन तरुण पिढीला उद्ध्वस्त करत असून, याला वेळीच वेसण घालण्यासाठी पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग आणि आरोग्य विभागाने समन्वय साधून संयुक्त मोहीम राबवावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या बैठकीत केले.

## मुरूम येथे श्री गणेश व्याख्यानमालेचे पहिले पुष्प संपन्न




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, मुरूम येथे श्री गणेश उत्सवानिमित्त आयोजित 'श्री गणेश व्याख्यानमाले'चे पहिले पुष्प दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाले.या प्रसंगी मु. अ. गांधी विद्यामंदिर, केसरजवळगा येथील श्री. बनजगोळे डी. बी. यांनी 'विद्यार्थी दशा व दिशा' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. विद्यार्थीदशा ही जीवनातील अत्यंत महत्त्वाची अवस्था असून, या काळात योग्य ध्येय निश्चित करून शिक्षण, संस्कार, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचा अंगीकार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून स्पष्ट केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य इंगोले जी. आर. होते. विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक जीवनात उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करून उज्ज्वल भवितव्य घडवावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.श्री गणेश व्याख्यानमालेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन व प्रेरणा मिळणार असून, या उपक्रमाचे विद्यार्थी व शिक्षकांनी स्वागत केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२६

# हे तथागता ...



मला दु:ख जाणवले
आणि त्या दु:खाचे कारणही मला समजले.

पण अजूनही
या जगातील कोणत्याही
गोष्टीचा त्याग करता येत नसल्यामुळे
मन व्याकुळ होत आहे.

हे तथागता ...
मला मुक्तीचा मार्ग दाखवा.
मी योग्य मार्गावर चालण्याचा प्रयत्न करीत आहे.
तुमचेच शरण मला आधार आहे.

अनेक जन्मांपासून या संसारात भटकत आले आहे.
किती पाप-पुण्य केले माहीत नाही.
मनभर आनंद शोधत राहिले,
पण शेवटी कायमचे दु:खच हातात आले.

वाऱ्याच्या झुळुकीतही
जणू बुद्धांचा धम्म ऐकू येतो
या संसारातून मुक्त होण्यासाठी
माझे पुण्य कमी पडले का ?

जेव्हा जीवन-मरण आणि पुनर्जन्माची
भावना येते. मृत्यूनंतर पुन्हा जन्म घेणाऱ्या
या जीवनात तुमचे गुण आठवले की
अमृतासारखा मधुर धम्म मनाला जाणवतो.

**- रागिणी हिवराळे**
**मो. ९९२३८३७०६०**

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक संपन्न



**बीड (भगवंत पाळवदे) :** प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत खरीप हंगाम २०२६-२७ च्या पीक कापणी प्रयोगांच्या (Crop Cutting Experiments) सद्यस्थितीचा व तालुका निहाय कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पीक कापणी प्रयोगांची ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याबाबत यंत्रणेला मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तसेच जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी (बीडीओ) आणि तालुका कृषी अधिकारी प्रत्यक्ष व दृकश्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) माध्यमातून उपस्थित होते. या सर्व यंत्रणांच्या समन्वयाने पीक कापणी प्रयोगांचे काम उत्तम प्रकारे पुढे जात आहे.बैठकीदरम्यान अंबाजोगाई, आष्टी, बीड, गेवराई, धारूर, पाटोदा, शिरूर, वडवणी यासह विविध तालुक्यांमधील सोयाबीन, मूग, कापूस, बाजरी, तूर आणि इतर पिकांच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील ऑनलाईन नोंदींच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ज्या तालुक्यांमध्ये काही प्रयोग प्रलंबित आहेत, ते काम लवकरात लवकर आणि विहित मुदतीत शंभर टक्के पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, चालू हंगामात शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ सुरळीतपणे व वेळेत मिळवून देण्यासाठी पीक कापणी प्रयोगांची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागाने परस्पर समन्वयाने काम करून राहिलेली सर्व प्रलंबित कामे पूर्णत्वास न्यावीत. तसेच ज्या गावांचे 'नो क्रॉप रिपोर्ट' (NCR) किंवा इतर तांत्रिक बाबींमुळे प्रयोग प्रलंबित आहेत, त्यांनी आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करावी, जेणेकरून शेतकऱ्यांच्या दाव्यांवर योग्य कार्यवाही होण्यास मदत होईल.महसूल, कृषी आणि पंचायत या तीनही विभागांनी सहकार्याची भूमिका ठेवून पीक कापणी प्रयोगांचे कामकाज अधिक गतिमान करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीच्या शेवटी केले.

# लोकसंवाद मोहिमेअंतर्गत बीड शहरात स्पर्धा परीक्षा, पोलीस भरती व सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन



**बीड (भगवंत पाळवदे) :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत जिल्हा माहिती कार्यालय आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरात ‘लोकसंवाद’ ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून बीड शहरातील आदर्श गणेश मंडळ (आदर्श नगर), हिंदवी स्वराज्य सार्वजनिक उत्सव समिती (श्रीराम नगर रोड) आणि ज्ञानज्योत गणेश मंडळ (चराटा फाटा) येथे मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी उपस्थित नागरिक, तरुण वर्ग आणि विशेषतः विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले.मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून कठोर परिश्रम करण्याचे आवाहन केले. स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, वेळेचे नियोजन कसे असावे आणि यशासाठी सकारात्मक दृष्टिकोन कसा ठेवावा, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाच्या टिप्स दिल्या. तसेच पोलीस दलात दाखल होऊन देशसेवेची इच्छा बाळगणाऱ्या तरुणांसाठी पोलीस भरतीच्या तयारीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यादरम्यान शारीरिक क्षमता चाचणीसोबतच लेखी परीक्षेसाठीचा नियमित सराव किती महत्त्वाचा आहे, हे त्यांनी स्पष्ट केले.आजच्या डिजिटल युगात वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांवर विशेष भर देत त्यांनी उपस्थितांना सावध केले. ऑनलाईन फ्रॉड, लॉटरीच्या नावाखाली येणारे बनावट मेसेज, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि स्वतःची गोपनीय माहिती अनोळखी व्यक्तींसोबत शेअर न करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. सायबर फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे महत्त्व त्यांनी उपस्थितांना पटवून दिले. गणेशोत्सवाच्या पवित्र वातावरणात धार्मिक कार्यक्रमांसोबतच अशा प्रकारच्या प्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल नागरिक व युवकांनी पोलीस प्रशासन आणि जिल्हा माहिती कार्यालयाचे आभार मानले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२६


## राजीव गांधी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न



**कडमाड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नीत राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड यांच्या वतीने 2024-25 या शैक्षणिक वर्षातील पदवीधर विद्यार्थ्यांसाठी 'पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ' सोमवार, दि.२१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड.लक्ष्मणराव मनाळ हे होते. प्राचार्य डॉ.भारत खंदारे आणि डॉ. व्यंकटेश लांब, व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.याप्रसंगी संस्थेच्या सचिव श्रीमती डॉ. शैलजा प्रमोद जोशी, तसेच मा. अंकुशराव (नाना) मोरे, अध्यक्ष, ज्ञानोदय विद्या प्रसारिणी इंग्लिश स्कूल, मंठा यांचीही प्रमुख उपस्थिती होती.शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल डॉ. भारत खंदारे सर व डॉ. व्यंकटेश लांब यांचा महाविद्यालयाच्या वतीने सन्मानचिन्ह शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन करुन दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. प्रास्ताविकातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यांनी पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे महत्त्व विशद केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. व्यंकटेश लांब यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, रोजगार, स्पर्धा परीक्षा, कौशल्यविकास आणि सामाजिक बांधिलकी या विविध विषयांवर मार्गदर्शन केले .बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबतच कौशल्ये, तंत्रज्ञानाची जाण आणि सामाजिक जाणीव विकसित करणे आवश्यक असून विद्यार्थ्यांनी स्वतः ला प्रकाशमान कसे करावे,आपली कार्य क्षमता कशी वाढवावी या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना मा. आ. ॲड. लक्ष्मणराव मनाळ यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल चा शिक्षणाच्या संदर्भानेयोग्य वापर करून त्याचा अतिरेक टाळावा असा संदेश देत पदवी ही केवळ शैक्षणिक पात्रतेची पावती नसून समाजाप्रती असलेल्या जबाबदारीची जाणीव करून देणारा महत्त्वाचा टप्पा आहे, असे त्यांनी नमूद केले.समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. किशोर काळे व प्रा. डॉ. जयश्री पाटील यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या यशस्वी कार्यक्रमाचे संयोजक व उपप्राचार्य प्रा.मनोज देवकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. आयोजनासाठी कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखा, सांस्कृतिक विभाग, परीक्षा विभाग,राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा विभाग तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.या प्रसंगी मोठ्या संख्येने प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी,पालक विद्यार्थी उपस्थित होते.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## शेकडो सूचनांचा पाऊस ! विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रस्तावावर सखोल आढावा घेणार

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय भरती परीक्षा टास्क फोर्सने छत्रपती संभाजीनगर विभागातील २४७ विद्यार्थ्यांशी स्मार्ट सिटी कार्यालयात थेट संवाद साधला. यावेळी परीक्षा वेळापत्रक, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तपासणी, पदसंख्या, परीक्षा केंद्रे, निकाल, नियुक्ती, प्रतीक्षा यादी व तक्रार निवारण यासह विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी सूचना मांडल्या.टास्क फोर्सच्या अध्यक्ष तथा सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस समितीचे सदस्य तथा पोलीस महासंचालक सदानंद दाते, सदस्य सचिव तथा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, सदस्य तथा नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे समितीचे सदस्य तथा संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले आणि सदस्य तथा आयआयटी मुंबईचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगड्डे सहभागी झाले. या संवाद कार्यक्रमात सातही जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी कार्यालयांतून विद्यार्थी ऑनलाइन सहभागी झाले होते.आज सकाळपासून विद्यार्थ्यांनी विविध गटात भेटी देत अनेक सूचना केल्या. टास्क फोर्स सदस्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सूचनाला गांभीर्याने ऐकून घेतले. विद्यार्थ्यांनी परीक्षांचे वार्षिक वेळापत्रक निश्चित करून त्याचे पालन करावे, परीक्षा पद्धती व अभ्यासक्रमात वारंवार बदल करू नयेत आणि बदल आवश्यक असल्यास पुरेशी पूर्वसूचना द्यावी, अशी मागणी केली. विविध संवर्गांतील रिक्त पदांची संख्या वेळेत जाहीर करून उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, जलसंपदा, वैद्यकीय व दंत वैद्यकीय अधिकारी यांसह अन्य पदांची नियमित भरती करावी, अशी सूचनाही करण्यात आली. एकाच उमेदवाराची अनेक पदांवर निवड झाल्यास पदनिवड व पदाचा त्याग (ऑप्टिंग आऊट) याबाबत स्पष्ट धोरण असावे. तसेच रिक्त पदांवर प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.प्रश्नपत्रिका निर्मितीपासून छपाई, वाहतूक व वितरणापर्यंतची प्रक्रिया अधिक सुरक्षित करावी, प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या व्यक्तीलाही परीक्षेचे स्वरूप व प्रश्नपत्रिकेची माहिती मिळणार नाही, अशी व्यवस्था विकसित करावी आणि प्रश्नपत्रिका फुटीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा, अशी सूचना विद्यार्थ्यांनी केली. प्रश्नपत्रिकांतील चुका व भाषांतरातील त्रुटी टाळण्यासाठी विषयतज्ज्ञांची मदत घ्यावी. राज्यसेवा मुख्य परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची ठेवावी, प्रश्नांची काठिण्याची पातळी विद्यापीठीय अभ्यासक्रमाशी सुसंगत असावी आणि गट-ब व गट-क परीक्षांतील भाषा विषय पात्रता स्वरूपाचे ठेवावेत, अशा सूचनाही मांडण्यात आल्या.उत्तरपत्रिका तपासणी व गुणांकनासाठी समान निकष निश्चित करून परीक्षकांची गुणवत्ता व पात्रता तपासावी, अशी मागणी करण्यात आली. उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची कार्बन प्रत, प्राथमिक व अंतिम उत्तरतालिका तसेच आदर्श उत्तरे उपलब्ध करून द्यावीत आणि आवश्यकतेनुसार फेरतपासणीची सुविधा द्यावी, अशी सूचना करण्यात आली. कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२३ व राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ मधील उत्तरपत्रिका तपासणी, गुणदान व गुणांतील फरकाबाबत विद्यार्थ्यांनी आक्षेप नोंदविले. चुकीचे प्रश्न व परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी पुराव्यासह लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन व्ही. राधा यांनी केले.ऑनलाइन परीक्षांबाबतही विद्यार्थ्यांनी विविध सूचना केल्या. संगणकाधारित परीक्षा घ्यायची असल्यास ती एकाच सत्रात घ्यावी, विविध सत्रांतील गुणांचे समायोजन टाळावे आणि सीसीटीव्ही चित्रीकरण व जैवमितीय पडताळणीसह प्रभावी नियंत्रण व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली. सुरक्षित यंत्रणा उपलब्ध होईपर्यंत ऑफलाइन, ओएमआर पद्धतीने परीक्षा घेण्याची सूचनाही करण्यात आली. पुढील एक वर्ष ऑनलाइन परीक्षा न घेता ओएमआर पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेतल्याचे व्ही. राधा यांनी स्पष्ट केले. ओएमआर परीक्षांसाठी प्रमाणित नियमावली तयार करण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.परीक्षा केंद्रांवर स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी व योग्य बैठक व्यवस्था असावी, उमेदवारांनी अर्ज केलेल्या जिल्ह्यातच, शक्य असल्यास, परीक्षा केंद्र द्यावे आणि केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे चित्रीकरण करावे, अशी मागणी करण्यात आली. उमेदवारांच्या तक्रारी व हरकतींसाठी केंद्रीकृत ऑनलाइन व्यवस्था सुरू करून त्यांचे वेळेत निराकरण करावे, अशी सूचना करण्यात आली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अधिकृत मदत कक्ष व मार्गदर्शक व्हिडिओ उपलब्ध करून द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली.तांत्रिक पदांसाठी किमान एक वर्षाचा अनुभव, पशुधन पर्यवेक्षकांच्या ३२२ पदांची जाहिरात व अभ्यासक्रम तातडीने प्रसिद्ध करावा, तसेच मोटार वाहन निरीक्षक, सहायक मोटार वाहन निरीक्षक, औषध निरीक्षक व अन्य तांत्रिक पदांच्या प्रश्नपत्रिकांचा दर्जा सुधारावा, अशी मागणी करण्यात आली. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पात्रतेनुसार अधिक संधी द्याव्यात. अभियांत्रिकी तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पदांसाठीच्या पात्रता अटींचा पुनर्विचार करावा, अशी सूचनाही करण्यात आली. कृषी सेवा गट - अ, गट - ब व गट - क पदांची एकत्रित जाहिरात तसेच गट - ब व गट - क संवर्गांसाठी सामायिक परीक्षा घेण्याची मागणी करण्यात आली.शिक्षक भरतीच्या परीक्षेत बालमानसशास्त्राला प्राधान्य देण्यात यावे, विषयानुसार स्वतंत्र प्रश्नपत्रिका तयार करावी आणि उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची प्रत उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना करण्यात आली. कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व विभागीय पोलीस उपनिरीक्षक पदांच्या परीक्षा नियमितपणे घ्याव्यात आणि संभाव्य रिक्त पदांची माहिती वेळेत जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. पोलीस भरतीतील १ हजार ६०० मीटर धावण्याच्या चाचणी पद्धतीचा पुनर्विचार करून मृत्यू झालेल्या उमेदवारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही विद्यार्थ्यांनी केली.आरक्षण, प्रमाणपत्रे व विविध योजनांबाबतही सूचना करण्यात आल्या. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आरक्षणातील अडचणी दूर कराव्यात, खेळाडू प्रवर्गातील प्रमाणपत्रांची काटेकोर पडताळणी करावी आणि सारथी, बार्टी, महाज्योती व टीआरटीआयच्या योजनांमध्ये पारदर्शकता वाढवावी, अशी मागणी करण्यात आली. सीईटीमार्फत अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना जात पडताळणी प्रमाणपत्राच्या विलंबामुळे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी प्रलंबित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी सूचनाही करण्यात आली. प्राध्यापक भरतीतील आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांची स्वतंत्र चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे व्ही. राधा यांनी सांगितले.एमपीएससीचे मनुष्यबळ, तांत्रिक क्षमता व संस्थात्मक रचना बळकट करावी, अध्यक्ष व सदस्यांची रिक्त पदे तातडीने भरावीत आणि परीक्षा, निकाल व नियुक्तीची प्रक्रिया निश्चित वेळेत पूर्ण करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. तमिळनाडू व गुजरात लोकसेवा आयोग तसेच संघ लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतींचा अभ्यास करून महाराष्ट्रासाठी उपयुक्त सुधारणा करण्याचे काम सुरू असल्याचे व्ही. राधा यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सूचनांसोबत तज्ज्ञांची मते विचारात घेऊन परीक्षा प्रक्रियेची गुणवत्ता, सुरक्षितता व विश्वासार्हता वाढविण्यासाठी आवश्यक निर्णय घेतले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्याच्या भरती परीक्षा प्रणालीचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक सुधारणा सुचविणे हे टास्क फोर्सचे उद्दिष्ट आहे.यावेळी विद्यार्थ्यांनी विविध विभागांतील रिक्त पदे पुनरुज्जीवित करून नियमित भरती करण्यासोबतच जाहिरातीपासून नियुक्तीपर्यंतची प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याची मागणी केली. प्रश्नपत्रिकांतील चुका व संदिग्ध प्रश्न टाळण्यासाठी स्वतंत्र छाननी व्यवस्था, उत्तरतालिकेतील पारदर्शकता, तक्रारींच्या निवारणासाठी अपीलीय प्राधिकरण आणि प्रश्नपत्रिका गळतीच्या तक्रारींची सीसीटीव्ही चित्रीकरणासह सखोल चौकशी करण्याच्या सूचना करण्यात आल्या. विविध तांत्रिक पदांच्या पात्रता अटींचा पुनर्विचार, आरक्षणातील अनुशेष भरणे, जात व खेळाडू प्रमाणपत्रांची काटेकोर पडताळणी, तसेच ऑनलाइन परीक्षांतील तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणीही विद्यार्थ्यांनी केली.विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रास्ताविकात सांगितले की, ९ ते १८ सप्टेंबरदरम्यान भरती परीक्षा सुधारणांसंदर्भात ३ हजार ६९४ निवेदने व ९ हजार ६९४ ई-मेल प्राप्त झाले आहेत. त्यापैकी सुमारे ३ हजार ४३२ ई-मेलला प्रशासनाकडून उत्तरे देण्यात आली आहेत. प्राप्त सूचना व निवेदनांचे ६० विषयांमध्ये वर्गीकरण करण्यात आले असून, त्याआधारे सादरीकरण तयार करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी, नुकतेच उत्तीर्ण झालेले उमेदवार व नवनियुक्त कर्मचाऱ्यांकडूनही सूचना घेण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२६


## शिवाजी कॉलेज कन्नड येथे 'सायन्स क्लब २०२६-२०२७' ची स्थापना; पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर



**छत्रपती संभाजीनगर** : श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड येथे आज, सोमवार दिनांक २१ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १:०० वाजता रसायनशास्त्र प्रयोगशाळेत (Chemistry Laboratory) 'सायन्स क्लब २०२६-२०२७' ची बैठक पार पडली.विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा आणि शैक्षणिक उपक्रमांना चालना मिळावी, या उद्देशाने या सायन्स क्लबची स्थापना करण्यात आली आहे. या बैठकीदरम्यान शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी विद्यार्थ्यांच्या अधिकृत पदांची व जबाबदाऱ्यांची घोषणा करण्यात आली.निवड झालेले पदाधिकारी (Office Bearers): * अध्यक्ष (President): आनंद उत्तम दरेकर (B.C.A. II) * उपाध्यक्ष (Vice Presidents): पंकज गंगाधर मखरे (B.C.A. I) व समृद्धी रामेश्वर वाघ (B.C.S. I) * सचिव (Secretary): रोहित शिवाजी चव्हाण (M.Sc. II Chemistry) * कोषाध्यक्ष (Treasurer): सुशिल कैलास बागुले (B.Sc. I)कार्यकारिणी सदस्य (Executive Members): * पायल वाल्मिक बागुले — B.Sc. II * अयान शरीफ शेख — B.Sc. III * ऋतुजा अंकुश मोहिते — B.C.A. III * वैष्णवी ईश्वर काळे — B.C.S. II * समीर बाळासाहेब पवार — B.C.S. III * नाहिद नदीम सय्यद — M.Sc. I Chemistry * जयश्री जब्बू जाधव — M.Sc. I Botany * तस्निम नासेर पठाण — M.Sc. II Botany * अभय अंकुशराव शिंदे — M.Sc. I Computer Science * ऋषिकेश संभाजी सुरेवाड — M.Sc. II Computer Scienceसायन्स क्लब मार्गदर्शक समिती (Faculty Committee):या सायन्स क्लबला खालील प्राध्यापकांच्या समितीचे मार्गदर्शन लाभणार आहे: * डॉ. डी. डब्ल्यू. शिंदे * डॉ. एस. बी. कोहळे * डॉ. टी. जे. जाधव * डॉ. पी. एस. आव्हाळे * डॉ. एस. एम. पवार * प्रा. सलीम शेखया कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले असून आगामी शैक्षणिक वर्षात विविध वैज्ञानिक स्पर्धा, प्रदर्शने व कार्यशाळा आयोजित केल्या जातील, असे सांगण्यात आले.

## विद्यार्थी दैवत हिचं खरी शिदोरी - डॉ प्रभाकर शेळके



**जालना** : मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या हस्तपोखरी या शाखेत माजी खासदार श्रध्देय अंकुशराव टोपे यांच्या जयंती स्मरणार्थ शैक्षणिक सप्ताह आयोजित कार्यक्रमात कवी, कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके म्हणले "आजचा विद्यार्थी पुस्तक वाचन लेखन यापासून दूर जातो आहे.त्याच्या हातात पुस्तक पडले पाहिजे कारण पुस्तक घडवते मस्तक मोबाईल बिघडवते जडमस्तक.नात्याची नाळ तुटत चालली आहे.मायेचा गोतावळा दिसत नाही.शिक्षण आपल्या अंगणात आले.सारी दुनिया मुठीत आली.तो क्षणात हे सारे पाहतो पण जवळचे दुर गेले.या प्रसंगी "केले संसार हे उभे, किर्ती आभाळ गोंदवा "तुमच्या पंखाच्या उबेला, आमच्या लाख लाख दुवा"शिक्षकांच्या जीवनात विद्यार्थी हिच खरी शिदोरी असते.असे मत त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रकाश गुंजकर यांनी प्रास्ताविक केले.गणेश ढाकणे, यांनी मनोगत व्यक्त केले.ज्ञानोबा हलमुख, श्री गाभडसर,धनंजय गुळवणे, श्री पठाण सर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.आभार प्रदर्शन गणेशराव ढाकणे यांनी मानले.या प्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थ्यांनी व राभा मगरे,काटे मामा, भाऊ पवार,मगरे मामा यांची उपस्थिती होती.

## श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, गढी येथे कबड्डी च्या कुमार गट व कुमारी गट अंजिक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

**बीड** : बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन, बीड आयोजित कुमार गट व कुमारी गट जिल्हा अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन मंगळवार दिनांक २३ सप्टेंबर २०२६ रोजी गढी ता.गेवराई येथे श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेचे उदघाटन मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठिक १०:०० वाजता युवा नेते मा.श्री.रणवीर (काकासाहेब)अमरसिंहजी पंडित,व आदि मान्यवरांच्या शुभहस्ते उदघाटन होणार आहे. सदरील स्पर्धेत बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त क्रिडा मंडळे व कबड्डी खेळाडूनी सहभाग घ्यावा. या अंजिक्यपद निवड चाचणी स्पर्धेत सहभाग घेताना राज्य कबड्डी असोसिएशन ने घालुन दिलेल्या नियमांचे पालन करावे. कुमार,कुमारी गटातील खेळाडूने वयाचे प्रमाणपत्र, ओळखपत्र,वजन या सर्व गोष्टी तंतोतंत पाळाव्यात कोणतेही दस्तऐवज खाडाखोड केलेले चालणार नाहीत. ज्या खेळाडूकडे राज्य कबड्डी असोसिएशनने घालुन दिलेल्या नियमानुसार कागदपत्राची पुर्तता होणार नाही त्या खेळाडूला या स्पर्धेत खेळवले जाणार नाही.या निवड चाचणी स्पर्धेतुन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संघ निवडला जाणार आहे.विरार पश्चिम ता.वसई जि. पालघर येथे दिंनाक ८ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर २०२६ या कलावधीत म्हाडा मैदान, विरार पश्चिम ता.वसई जि. पालघर येथे होणाऱ्या ५३ व्या कुमार गट व कुमारी गट राज्य अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा संघ निवडला जाणार आहे.सदरील संघामध्ये आपले क्रिडा नैपूण्य दाखवुन राज्यस्तरीय स्पर्धेचे नेतृत्व करण्यासाठी निवड केली जाणार आहे.याची सर्व क्रिडा मंडळे व खेळाडूनी नोंद घ्यावी.सदरील निवडचाचणी स्पर्धा गढी येथील शिवछत्र इनडोअर स्टेडियम व खुल्या मैदानावर होणार आहेत. कुमार गट वयोमर्यादा २० वर्ष असुन वजन ७५ किलो वजन गट व कुमारी गटा साठी वयोमर्यादा २० वर्ष असुन वजन ६५ किलो वजन गटाची मर्यादा आहे.खेळाडूंनी सोबत मॅट शूज असणे आवश्यक आहे.याची सर्व खेळाडूनी नोंद घ्यावी. सर्व क्रिडामंडळे व खेळाडूं व प्रशिक्षकांनी सकाळी ठिक ९:३०वाजता मैदानावर उपस्थित राहावे. असे बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन च्या वत्तीने कळविण्यात आले आहे. तरी या अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत जास्तीत जास्त क्रिडा मंडळानी व खेळाडूनी सहभाग नोंदवावा असे आव्हान महाराष्ट्र राज्य कबड्डी सोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष माजी आमदार.श्री. अमरसिंह शिवाजीराव पंडित,तसेच बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष मा. आ.श्री.विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी केले आहे

## तालुकास्तरीय कुस्तीच्या आखाड्यात इकरा पब्लिकच्या मल्लांची दणदणीत बाजी!



**जळगाव** : तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज,जळगावच्या दोन विद्यार्थ्यांनी आपल्या दमदार कामगिरीच्या जोरावर विजय मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रवेश निश्चित केला आहे.रय्यान शेख मुख्तार याने ३८ किलो वजनी गट, अंडर-१४ मध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले.तसेच रेहान नईम खाटीक याने ४५ किलो वजनी गट, अंडर-१७ मध्ये प्रभावी कामगिरी करत विजय मिळवला.या दोन्ही मल्लांची आता जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून, पुढील सामना चाळीसगाव येथे होणार आहे.दोन्ही खेळाडूंच्या या यशामागे त्यांना मिळालेले सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.क्रीडा शिक्षक आमीर सर यांच्या विशेष प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य,आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक जिद्द अधिक बळकट केली.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ.करीम सालार, जनरल सेक्रेटरी एजाज मलिक आणि प्राचार्य शेख शकील यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या."मैदानात घाम गाळणाऱ्या मेहनतीला यशाची पदके लाभतात," याची प्रचिती इकराच्या या युवा मल्लांनी आपल्या कामगिरीतून दिली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२६

## वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळत सुनीता पावशेरे यांचे सामाजिक उपक्रम



**कलदेव लिंबाळा (प्रा. नागसेन कांबळे) :** आजकाल होणारा अनावश्यक खर्च एखाद्या सामाजिक उपक्रमात वापरून समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्याचा संकल्प करून अनेकजण संकल्प सोडतात पण प्रत्यक्ष वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रम ग्रामपंचायत गटनेत्या तथा राष्ट्रवादी महिला आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सुनीता देविदास पावशेरे यांच्या वतीने यंदाही राबविण्यात नेहमीप्रमाणे राबविण्यात आला.अशा सातत्याने सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या गटनेत्या सार्वजनिक जीवनात खूप कमी असतात.पहाटे व्यायाम व फिरण्यासाठी येणाऱ्या महिला, युवक व नागरिकांना सुकामेव्याचे वाटप करण्यात आले. आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देत पहाटेचा व्यायामाने शरीर तंदुरुस्त ठेवण्यासोबतच मन प्रसन्न आणि उत्साही रहावेमहिला, पुरुष व नागरिकांनी नियमित व्यायामातून निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करावा. या हेतूने दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उपक्रम राबविण्यात आला.गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शहीद भगतसिंग विद्यालय तसेच तीन अंगणवाड्यांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना हातभार लावण्याचा प्रयत्न यामागे असल्याचे सांगण्यात आले.तसेच शाळा व अंगणवाडी परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला .वाढदिवसाचा खर्च केवळ उत्सवावर न करता आरोग्य, शिक्षण व पर्यावरणासाठी योगदान देऊन सामाजिक बांधिलकी जपण्याचा आपला दर वर्षी प्रयत्न असल्याचे सुनीता पावशेरे यांनी सांगितले.यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, मदतनीस विद्यार्थी आदींची उपस्थित होती .

## गुंठेवारीसाठी किमान सहा महिने मुदतवाढ दया - राजेंद्र दाते पाटील

**छत्रपती संभाजीनगर :** महानगर पालिका छत्रपती संभाजीनगर गुंठेवारी योजनेत खुले प्लॉट व बांधकाम अधिकृत करण्या साठी दुष्काळ सदृश स्थिती पाहता सहा महिने जुन्या निर्णया प्रमाणे मुदत वाढ देण्याचे आदेश तात्काळ करा अशी मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी एकनाथराव शिंदे उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री महाराष्ट्र शासन यांचे कडे जनहितार्थ केली होती.मागणीचे गांभीर्य लक्षात घेता उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथराव शिंदे यांनी नगर विकास विभागा दोन चे प्रधान सचिव डॉ गोविंदराज यांना तातडीने निर्देश जारी केले असुन तसा मेल डॉ राजेंद्र दाते पाटील यांना एकनाथ शिंदे यांनी पाठवला आहे.या निवेदनात असे नमुद केले आहे की, महानगर महापालीका छत्रपती संभाजीनगर येथे गुंठेवारी योजने अंतर्गत घरे व खुले प्लॉट सवलतीच्या योजनेत नियमानुकूल करून घेण्याची मोहीम सुस्थितीत सुरु आहे. दुष्काळ सदृश स्थितीमुळे नागरिक हतबल झालेले असल्यामुळे सप्टेंबर महिन्या पर्यंत मुदत दिली होती ही मुदत वाढ किमान सहा महिने होणेअत्यावश्यक आहे.अचानकपणे मनपा आयुक्त यांनी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंतच प्लॉट,घराच्या गुंठेवारीसाठी अखेरची मुदत देण्याचा निर्णय केला असुन हा अंत्यन्त अन्याय कारक ठरणार असुन यात भरीसभर म्हणुन ०१नोव्हेंबर २०२६ पासून अनधिकृत घरे पाडण्याची मोहीम सुरू करण्याची घोषणा ही तर गोरगरीब जनतेने प्रचंड मेहनतीने प्राप्त केलेली सदरची मालमत्ता पडण्याचा निर्णय निवारा या संकल्पने वर घाला घालण्याचा अन्याय कारक निर्णय आहे.पुढे जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणतात की,गुंठेवारी योजनेत खुले प्लॉट अधिकृत करण्यासाठी महापालिकेने १५ सप्टेंबर पर्यंत मुदत दिली होती. ही मुदत वाढविण्याचा निर्णय आयुक्त अमोल येडगे यांनी गुरुवारी घेतला तो फक्त ३१ऑक्टोबर २०२६ पर्यंतच असुन नागरिकांना खुले प्लॉट आणि घरांची गुंठेवारी चार्जेसमध्ये ५० टक्के सूट देण्यात आली आहे.घरांसाठी बेटरमेंट चार्ज १०० टक्के ड्रोनद्वारे सर्वेक्षण करून माफ करणार असुन सोबतच अन्सलरी आणि साइड मार्जिन वरील प्रत्येकी दहा टक्के लावण्यात येणारा दंडही माफ केलाआहे.गुंठेवारीत पूर्वी आकारण्यात येणारा ६० टक्के दंड आता माफ झाला आहे. त्यामुळे नागरिकांकडून सध्या चांगला प्रतिसाद मिळत असुन ०१एप्रिल ते १५ सप्टेंबर पर्यंत गुंठेवारी योजनेतून ५७ कोटी २९ लाख रुपये मनपास प्राप्त झाले असुन आता गुंठेवारी योजनाच पूर्ण पणे बंद करण्याचा आयुक्ताचा मानस जनविरोधी असुन अगदी शेवटच्या दिवशी १२ ते १५ कोटी रुपये नागरिकांच्या वतीने भरले जातील अशी अपेक्षा असुन ही बाब मनपाच्या उत्पन्नास भर घालणारे असुन सहा महिने मुदत वाढ म्हणजे मनपाच्या उत्पन्ननात भर घालणारा शासनाचा सकारात्मक निर्णय ठरेल असेही जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले असुन याच मुळे त्यांनी नगरविकास मंत्र्यांना विनंती केली आहे की, महानगर पालिका छत्रपती संभाजीनगर गुंठेवारी योजनेत खुले प्लॉट व बांधकाम अधिकृत करण्या साठी दुष्काळ सदृश स्थिती पाहता सहा महिने जुन्या दर व निर्णया प्रमाणे मुदत वाढ देण्याचे आदेश तात्काळ जनहितार्थ व्हावेत ही नम्र विनंती त्यांनी केली नगर विकास विभागा दोन चे प्रधान सचिव डॉ गोविंदराज यांना तातडीने निर्देश एकनाथराव शिंदे यांनी जारी केले असल्याची माहिती जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी दिली आहे.

## एमआयएम पक्षाची कन्नड तालुका व शहर कार्यकारिणी जाहीर



**कन्नड (अरुण थोरात) :** एमआयएम पक्षाची कन्नड तालुका व शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. एमआयएम चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार हाजी सय्यद इम्तियाज जलील यांच्या आदेशानुसार, औरंगाबाद जिल्हाध्यक्ष शारेक नक्शबंदी, जिल्हाकार्याध्यक्ष जावेद खान पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत कोळसवाडी, ता. कन्नड येथे दि.20 सप्टेंबर रोजी कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले. पक्षाचे कन्नड तालुकाध्यक्ष नासेर पटेल व शहराध्यक्ष रईसभाई पवार यांच्या विशेष प्रयत्नातून आयोजित या छोटेखानी कार्यक्रमात कन्नड तालुका व शहर कार्यकारिणीची पुढील प्रमाणे घोषणा करण्यात आली. इब्राहिम हारुण पठाण- तालुका महासचिव, आबेद भाई पिंजारी- तालुका सचिव व सोशल मीडिया प्रभारी, अशफाक मजिद शेख- तालुका उपाध्यक्ष, शेख सालारोद्दीन शेख रफिकुद्दीन- तालुका सचिव, अक्रम शहा असलम शहा- तालुका उपाध्यक्ष, रफीक लतिफ शेख- तालुका संघटक, कमर मुसा शहा- तालुका सहसंघटक, आलिम इब्राहिम शेख- जि. प. सर्कल अध्यक्ष चिंचोली लिं. सोहेल(सज्जु) निसार शेख- जि. प. सर्कल अध्यक्ष पिशोर, अरबाज अहेमद शेख- पिशोर शहराध्यक्ष, शेख मुस्तकीम फारुक- पिशोर शहर उपाध्यक्ष, कन्नड शहर कार्यकारिणी पुढील प्रमाणे:- अहेमद समद सय्यद- कार्याध्यक्ष, आरेफ कुरैशी- महासचिव, हुसैन एहतेशाम शेख- उपाध्यक्ष, जाकीर अहेमद पटेल- उपाध्यक्ष, साबिर गुलाम नबी- सचिव, सलिम महेमुदखा- सचिव साद अब्दुल अज़ीज़- प्रवक्ता, अफजल अनवर शेख- कोषाध्यक्ष, सोहेल अरमान शेख- सचिव, सुनिल गीरजाराम पाटील- सचिव, नितिन रामकृष्ण जाधव- उपाध्यक्ष, यावेळी विकास एडके जिल्हा महासचिव, इद्रिस नवाब युवा जिल्हाध्यक्ष, अंकितातार्इ गजहांस महिला जिल्हाध्यक्ष, कलिम भैय्या जिल्हा महासचिव, पवन गायकवाड जिल्हा सचिव, एम. एम. शेख जिल्हा कोषाध्यक्ष, नईम शेख जिल्हा उपाध्यक्ष, राजु पटेल जिल्हा उपाध्यक्ष, समि भाई जिल्हा सहसचिव, अब्दुल फराज जिल्हा सचिव, शारेक भाई अन्सारी (खासदार कार्यालय), सलिम पोलीस पाटील, सय्यद मतिन भाई, माजेद पवार, गाझी शेख तसेच स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा कमिटीच्या वतीने नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## व्हॉलीबॉल स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयाच्या दणदणीत विजय



**मुरुम, (प्रा. सुधीर पंच्चगल्ले) :** उमरगा येथे संपन्न झालेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयाच्या दणदणीत विजय भारत शिक्षण संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय मुरूम. उमरगा येथे संपन्न झालेल्या 19 वर्षाखालील हॉलीबॉल स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने दणदणीत विजय प्राप्त करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून यामध्ये संकेत कंटेकुरे, किरण कनमुसे, आशिष घोडके, अजय गणेश कर, चंद्रकांत सुतार ,युवराज खजुरे, प्रतीक करगले, उमेश खजुरे आधी खेळाडू सहभागी होते अभिनंदन व कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले तसेच क्रीडा प्रमुख बालाजी इंगोले यांनी यशस्वी टीमला अभिनंदन व शुभेच्छा दिल्या

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२६


## दुष्काळाच्या होरपळीत 'काजू-बादाम'छाप संवेदना: बळीराजाच्या जखमेवर सरकारी मीठ!

**छत्रपती संभाजीनगर :** एकीकडे घासासाठी तरसणारा आणि आभाळाकडे डोळे लावून बसलेला बळीराजा,तर दुसरीकडे दुष्काळ आढावा बैठकीत काजू-बदामावर ताव मारणारे बेफिकीर मंत्री अन् लाचार प्रशासन! महाराष्ट्राच्या वाळलेल्या छातीवर मारलेला हा शाही ताव म्हणजे निव्वळ संतापजनक नव्हे,तर लोकशाहीचा उघड अवमान आहे.ज्या बैठकीत पाण्याच्या थेंबाथेंबासाठी तरसणाऱ्या जनतेचे अश्रू पुसायचे होते,तिथे सत्ताधाऱ्यांच्या जिभेचे चोचले पुरवले जात होते.जनतेच्या करातून जमा झालेल्या पैशांवर ही कसली 'दुष्काळ मेजवानी'? घराबाहेर पाण्यासाठी मैलोन्मैल भटकणाऱ्या माय-भगिनींचे फोड आणि फाशीचा फंदा जवळ करणारा शेतकरी या वातानुकूलित मखमली सोफ्यांवर बसलेल्या 'साहेबांना' दिसत नाही का? जनतेच्या दु:खाचे भांडवल करून स्वत:ची ताटे सजवणाऱ्या प्रशासनाला जराही लाज कशी वाटत नाही? हा केवळ निर्लज्जपणा नाही, तर संकटात सापडलेल्या जनतेची क्रूर थट्टा आहे.या लाजीरवाण्या प्रकाराचा तीव्र शब्दांत निषेध! प्रशासनाने या उधळपट्टीबद्दल जनतेची तात्काळ माफी मागावी; अन्यथा जनतेच्या असंतोषाचा हा भडका या 'काजू-बादामी' मानसिकतेला राख केल्याशिवाय राहणार नाही.

## मराठवाड्यातील किल्ले सांस्कृतिक वारशाचे प्रतीक: डॉ. रफीक झकेरिया कॉलेजमध्ये एकदिवसीय परिसंवाद




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन, कॅम्पस-२, छत्रपती संभाजीनगर येथील इतिहास विभागाच्या वतीने हिस्ट्री हेरिटेज क्लबच्या उद्घाटनानिमित्त ‘मराठवाड्यातील किल्ले : इतिहास, वारसा आणि सांस्कृतिक महत्त्व’ या विषयावर एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.परिसंवादाच्या प्रमुख वक्त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभागाच्या प्रा. बीना सेंगर यांनी किल्ल्यांच्या ऐतिहासिक, राजकीय आणि सांस्कृतिक महत्त्वावर प्रकाश टाकला. किल्ले हे केवळ संरक्षणाची ठाणी नव्हती, तर ती तत्कालीन राजकीय सत्ता, प्रशासन, संस्कृती आणि ऐतिहासिक वारशाची महत्त्वपूर्ण केंद्रे होती, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी मराठवाड्यातील किल्ल्यांच्या इतिहासाचा सविस्तर आढावा घेतला.कौटिल्याच्या ‘अर्थशास्त्रा’तील सप्तांग सिद्धांताचा संदर्भ देत त्यांनी स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, कोष, दंड आणि मित्र या राज्याच्या सात अंगांमध्ये ‘दुर्गा’ला महत्त्वाचे स्थान असल्याचे स्पष्ट केले. प्राचीन भारतीय राजकीय विचारात राज्याची सुरक्षा, स्थैर्य आणि प्रशासन यासाठी किल्ल्यांना महत्त्वपूर्ण स्थान होते, असे त्यांनी नमूद केले.परिसंवादात मराठवाड्यातील प्रमुख किल्ल्यांपैकी दौलताबाद, नळदुर्ग आणि अंतूर या किल्ल्यांच्या ऐतिहासिक व संरक्षणात्मक वैशिष्ट्यांची माहिती देण्यात आली. दौलताबाद किल्ल्याची अभेद्य संरक्षणव्यवस्था, तर नळदुर्ग किल्ल्याची जलव्यवस्था आणि स्थापत्यवैशिष्ट्ये ही मराठवाड्याच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाची उल्लेखनीय उदाहरणे असल्याचे सांगण्यात आले. यावेळी जलदुर्ग, गिरिदुर्ग, वनदुर्ग, मरुदुर्ग आणि भूदुर्ग अशा किल्ल्यांच्या विविध प्रकारांचीही माहिती देण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा. विद्या प्रधान यांनी ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनाची तसेच नव्या पिढीला आपल्या परिसराच्या इतिहासाशी जोडण्याची गरज अधोरेखित केली. मराठवाड्यातील किल्ले हे या प्रदेशाच्या ऐतिहासिक ओळखीचा आणि सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग असून त्यांच्या अभ्यास व संवर्धनासाठी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनी व उपस्थितांनी ऐतिहासिक वारसा जतन करण्याची तसेच सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करण्याची शपथ घेतली. आपल्या इतिहासाचा आदर करणे, ऐतिहासिक वास्तू व स्मारकांचे जतन करणे आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी योगदान देणे, असा या शपथेचा मुख्य आशय होता.इतिहास विभागाच्या डॉ. सय्यदा लुबना शिरीन या कार्यक्रमाच्या संयोजक होत्या, तर इरफान शेख यांनी सहसंयोजक म्हणून कार्य केले व आभार मानले. अर्शिया नाझनीन यांनी प्रमुख वक्त्या प्रा. बीना सेंगर यांचा परिचय करून दिला.कार्यक्रमास कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या श्रीमती नाझेमा खान, शिक्षकवृंद तसेच महाविद्यालयातील मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी सय्यदा आयशा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## विचार मंथन करावे जरा!

सांगतो शब्दात माझ्या,
आजच्या तरुणाईची व्यथा.
अवेळी जग सोडून जाताच,
बनू लागली करुण कथा. १

मित्रांनो का अशी वेळ यावी,
विचार मंथन करावे जरा.
नैराश्यात जीवन संपविणे,
हाच एक मार्ग नाही खरा. २

स्वत:चे कौशल्य ओळखा,
नैराश्य जाईल पळून दूर.
जन्मदात्या आई बापाच्या,
डोळ्यात येणार नाही पूर. ३

येणाऱ्या संकटांचा सामना,
वीर धुरंदर होऊन करावे.
संकटांच्या छाताडावर बसून,
संकटांना सदैव पुरून उरावे. ४

रात्रंदिन काबाडकष्ट करून,
आई बाप वेदना सोसतात.
मुलं शिकून खूप मोठे व्हावे,
दु:ख भोगून मुलांना पोसतात. ५

मित्रांनो जिंदगीच्या शर्यतीत,
निराशेने हार का बरे मानावे.
हार मानण्या अगोदर मित्रांनो,
आई वडिलांचे कष्ट जाणावे. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**








महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२६

# झाडं बोलतात फक्त त्यांची भाषा समजून घ्यायला हवी! होय ! गणेश घुले यांचं ‘झाड' बोलतंय




‘सूर्य उगवतो तेव्हा फक्त दिवस सुरू होतो; पण झाडं उगवतात तेव्हा चांगले दिवस सुरू होतात,’ हा विचार झाडांच्या अस्तित्वाचा व्यापक अर्थ सांगून जातो. झाड म्हणजे केवळ हिरवाई नाही, केवळ सावली नाही आणि केवळ ऑक्सिजनचा स्रोतही नाही. झाड म्हणजे देण्याची संस्कृती, जगण्याची शिकवण आणि पुढच्या पिढीच्या भवितव्याची हमी आहे. म्हणूनच ‘झाडं बोलतात, फक्त त्यांची भाषा आपल्याला समजली पाहिजे,’ असे म्हणावेसे वाटते. गणेश घुले यांची ‘झाड’ ही बालकादंबरी याच न ऐकू येणाऱ्या भाषेला शब्द देऊन निर्माण झाली आहे. समकालीन मराठी बालसाहित्यात ‘झाड’ ही कादंबरी वेगळ्या आशयसूत्रामुळे लक्षवेधी ठरली आहे. आजच्या अस्वस्थ वर्तमानाचे, बदलत्या सामाजिक वास्तवाचे आणि निसर्गासमोरील संकटांचे भान या कादंबरीतून व्यक्त होते. माणसाला स्वत:पेक्षा इतर माणसे मोठी झालेली सहन होत नाहीत; त्याचप्रमाणे झाडेही मोठी झालेली काहींना चालत नाहीत. विकासाच्या नावाखाली निसर्गाची होणारी हानी, बदलती मानसिकता आणि शिक्षणव्यवस्थेसमोरील प्रश्न या सगळ्यांचा विचार ‘झाड’ या कादंबरीतून पुढे येतो. विशेष म्हणजे या कादंबरीत झाडच निवेदक आहे. सामान्यत: कादंबरीतील माणसांच्या व्यक्तिरेखांमधून मानवी गुण-दोषांचे चित्रण केले जाते; परंतु येथे झाड माणसांकडे पाहते, त्यांचे जगणे अनुभवते आणि त्यांच्याविषयी, स्वत:विषयी बोलत राहते, सांगत राहते. देणे हाच ज्याचा धर्म आहे, अशा झाडाला स्वार्थ, अपेक्षा किंवा मोबदल्याची गरज नसते. सावली, फळे, फुले, पाने, निवारा आणि श्वास इतर गोष्टी झाडे आपल्याला सतत देत राहतात. त्यामुळे जेव्हा असे निस्वार्थ झाड निवेदकाच्या भूमिकेत येते, तेव्हा त्याचे निवेदन केवळ एका कथानकाचे वर्णन राहत नाही; ते माणसाला स्वत:कडे आणि आपल्या भोवतालाकडे नव्या दृष्टीने पाहायला लावते, त्याविषयी विचार करायला लावते. या कादंबरीतील पठाण सर हे शाळा आणि झाड यांच्या अस्तित्वासाठी संघर्ष करणारे महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. त्यांच्या संघर्षातून शिक्षणसंस्थेचे आणि निसर्गाचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित होते. शाळा म्हणजे केवळ इमारत नसते आणि झाड म्हणजे केवळ निर्जीव लाकूड नसते. शाळा मुलांचे भविष्य घडवते, तर झाड त्यांच्या भविष्यासाठी जगण्याची परिस्थिती निर्माण करते. त्यामुळे शाळा आणि झाड या दोन्हींचे रक्षण करणे म्हणजे पुढच्या पिढीचे रक्षण करणे होय, हा विचार कादंबरीतून प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. ‘झाड’चे कथाविश्व केवळ एका झाडापुरते किंवा एका शाळेपुरते मर्यादित नाही. गावातील शाळा, मुले, शिक्षक, पालक, कौटुंबिक व सामाजिक नातेसंबंध, गावचे मंदिर, सद्बुद्धी असणारे चोर, एकाकी पण झाडासमवेत जीवन जगणारी नंदा आजी, शाळेचा, गावचा परिसर, शहर, रस्ते, माणसे आणि त्यांच्यातल्या विविध प्रवृत्ती यांसह गावातील गढूळ राजकारण, विकास, नीती-अनिती त्यात सोशल मिडियाची भूमिका यांसारखे अनेक सामाजिक घटक कादंबरीत येतात. त्यामुळे बालकादंबरी असूनही तिचा आशय केवळ बालमनापुरता सीमित राहत नाही. ती मुलांसोबतच मोठ्यांनाही प्रश्न विचारते. आजच्या काळात झाडे आणि मराठी शाळा या दोन्हींसमोर निर्माण झालेल्या संकटांचा विचार करणे आवश्यक ठरते. एका बाजूला निसर्गाचा ऱ्हास होत असताना दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागातील मराठी शाळांच्या अस्तित्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. या दोन्ही गोष्टींचे महत्त्व ‘झाड’ ही कादंबरी संवेदनशीलतेने अधोरेखित करते. झाड वाचविणे आणि शाळा वाचविणे ही केवळ एखाद्या व्यक्तीची किंवा संस्थेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, अशी जाणीव कादंबरी निर्माण करते. ‘झाड’मध्ये गावातील सामाजिक जीवनाचेही विविध पैलू दिसतात. माणसांमधील आपलेपणा, स्वार्थ, संघर्ष, नात्यांची गुंतागुंत, बदलत्या मूल्यव्यवस्था आणि विकासाच्या नावाखाली घडणारे परिवर्तन या सगळ्यांकडे झाड एका साक्षीदाराच्या भूमिकेतून पाहते. त्याचवेळी माणसांमध्ये आणि झाडांमध्ये असलेला साम्य भेद अधोरेखित करते. त्यामुळे झाडाचे निवेदन अनेकदा माणसाच्या मर्यादेपलीकडे जाऊन विचार करायला लावते. माणूस झाडाकडे पाहतो; पण या कादंबरीत झाड माणसाकडे पाहते. हाच या कादंबरीचा अनोखा साहित्यिक आविष्कार म्हणता येईल.कादंबरीतील काही प्रसंग वाचताना वाचकाच्या मनात अस्वस्थता निर्माण होते. झाड आपल्याला श्वास देते; मात्र या कादंबरीतील झाड वाचताना काही प्रसंग असे येतात की वाचकाचा श्वासच क्षणभर थांबतो. मन भरून येते. झाड बोलते की, "रखरखत्या उन्हाळ्यात सगळ्यांची धाव अपसुक माझ्या सावलीकडं असते. निर्जीव गाड्यांपासून, मुक्या प्राण्यांपासून ते बोलक्या माणसांपर्यंत !ओळखीच्या लोकांपासून अनोळखी लोकांपर्यंत! सगळ्यांचा हक्काचे ठिकाण म्हणजे माझी सावली." विकासाच्या नावाखाली रस्त्याची रुंदीकरण म्हणून शाळा आणि झाड हे काढले जाणार ही बातमी ऐकल्यापासून झाडाला झोप लागत नाही. झाड अस्वस्थ होते विचार करायला लागते माणूस आणि माणसाचा स्वार्थीपणा याबद्दल बोलायला लागते पण शेवटी पठाण सरांच्या मोठ्या संघर्षानंतर हे झाड आणि शाळा दोन्ही वाचतात तेव्हा झाड शेवटी म्हणते, "किती दिवस झाले मी झोपलो नव्हतो. आज रात्री मात्र पानं, फांद्या, पारंब्यांसकट मला शांत झोप लागेल. शाळा वाचली. वडाचं झाड वाचलं ! हे ऐकून तर माझी पानं आनंदानं सळसळायला लागली. पारंब्या आनंदानं झुलू लागल्या. कधी नव्हे एवढा आनंद मला झाला होता. या फांदीवरून त्या फांदीवर पाखरं उड्या मारू लागली. घरट्यातल्या पाखरांनी नुसता किलबिलाट सुरू केला. जणू काही पाखरांची शाळा सुटली आहे. असंच वाटायला लागलं. जणू काही आज माझा पुनर्जन्मच झालाय असं मला वाटलं हे मात्र नक्की!" या पद्धतीने झाड स्वत:शी आणि माणसाशी संवाद साधते. निसर्गाविषयीची आपली भूमिका, मुलांच्या भवितव्याविषयीची आपली जबाबदारी आणि शिक्षणव्यवस्थेविषयीची आपली संवेदनशीलता यांचा नव्याने विचार करण्यास ही कादंबरी भाग पाडते. गणेश घुले यांच्या साहित्यिक प्रवासाचा विचार केला तर बालमनाशी त्यांचे असलेले नाते यापूर्वीही प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या ‘सुंदर माझी शाळा’ या कवितासंग्रहातून शाळा, मुले आणि बालविश्व यांच्याशी असलेली त्यांची साहित्यिक बांधिलकी दिसून येते. त्यांच्या बालकवितांनी पाठ्यपुस्तकांपासून विविध शैक्षणिक स्तरांपर्यंत आणि वाड्या-वस्त्यांपासून घराघरांपर्यंत पोहोचण्याचा अनुभव घेतला आहे. त्या पार्श्वभूमीवर ‘झाड’ ही बालकादंबरी त्यांच्या साहित्यिक संवेदनशीलतेचा पुढचा टप्पा म्हणून पाहता येते. ‘झाड’ ही कादंबरी वाचताना सर्वात महत्त्वाची जाणीव होते ती म्हणजे निसर्ग आणि माणूस यांचे नाते परस्परावलंबी आहे. आपण झाडाला वाचवतो असे म्हणतो; प्रत्यक्षात झाड आपल्याला वाचवत असते. आपण शाळा वाचवतो असे म्हणतो; प्रत्यक्षात शाळा पुढच्या पिढीचे भविष्य घडवत असते. या परस्परसंबंधाची जाणीव मुलांच्या मनात लहानपणापासून निर्माण होणे आवश्यक आहे. या दृष्टीने पालक, शिक्षक आणि विद्यार्थी या तिन्ही घटकांसाठी ‘झाड’ ही महत्त्वाची साहित्यकृती ठरते. आजच्या मुलांना अस्वस्थ भोवताल समजून घेण्यासाठी आणि पालकांना आपल्या मुलांच्या भवितव्याकडे नव्या संवेदनशीलतेने पाहण्यासाठी ही कादंबरी उपयुक्त ठरते. पर्यावरण, शिक्षण, सामाजिक मूल्ये आणि मानवी नातेसंबंध या सर्वांचा एकत्रित विचार करणारी ही बालकादंबरी बालसाहित्याच्या चौकटी अधिक व्यापक करते. झाडं खरोखरच बोलतात. पानांच्या सळसळीतून, फांद्यांच्या डोलण्यातून, फुलांच्या सुगंधातून, सावलीच्या स्पर्शातून आणि आपल्या अस्तित्वाच्या नि:शब्द साक्षीतून ती सतत आपल्याशी बोलत असतात. प्रश्न एवढाच आहे की आपण त्यांची भाषा समजून घेतो का?गणेश घुले यांनी ‘झाड’ या बालकादंबरीच्या माध्यमातून याच नि:शब्द भाषेला शब्द दिले आहेत. हे ‘झाड’ एकदा वाचणे म्हणजे केवळ एका कादंबरीचे वाचन नव्हे; तर आपल्या भोवतालाकडे, आपल्या मुलांकडे, आपल्या शाळेकडे आणि आपल्या निसर्गाकडे नव्या नजरेने पाहण्याचा अनुभव आहे. या झाडाच्या फांद्या जशा विस्तारत जातात, तशाच वाचकाच्या विचारांच्याही फांद्या विस्तारत जातात. म्हणूनच भर उन्हाळ्यात प्रत्येकाच्या घरात एक झाड असावे आणि प्रत्येकाच्या मनातही एक ‘झाड’ रुजावे. घरातील झाड सावली देईल; पण गणेश घुले यांचे ‘झाड’ विचारांची सावली देईल. मुलांच्या हातात पुस्तक देताना त्यांच्या मनात निसर्ग, शाळा आणि माणुसकीची बीजे पेरायची असतील, तर हे ‘झाड’ नक्कीच वाचायला हवे. कारण झाड आहे म्हणून आपली वाढ आहे; आणि हे विचारांचे झाड रुजले तरच समाजाची खरी वाढ होईल.



गणेश घुले

Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२६


# जिंतूरात बंजारा आंदोलनाला पुन्हा हिंसक वळण!



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी जिंतूर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला सोमवार, २१ सप्टेंबर रोजी अचानक हिंसक वळण लागले. मागील अनेक दिवसांपासून उपोषण करणारे आंदोलक विनोद आडे यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने आंदोलनस्थळी एकच खळबळ उडाली. त्यानंतर संतप्त आंदोलकांनी अचानक रस्त्यावर उतरून रास्ता रोको केला. यावेळी आयशर ट्रक, ऑटो आणि स्कूल व्हॅनची तोडफोड करण्यात आल्याने शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी विनोद आडे हे गेल्या अनेक दिवसांपासून उपोषण करीत आहेत. शासनाने मागणीबाबत ठोस निर्णय घ्यावा, या मागणीसाठी आंदोलनाची तीव्रता वाढत आहे. सोमवारी आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने समाजबांधव जमले असताना विनोद आडे यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. या घटनेनंतर आंदोलनस्थळी मोठा गोंधळ निर्माण झाला आणि काही वेळातच आंदोलकांनी रस्त्यावर उतरून अचानक रास्ता रोको सुरू केला.यावेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात असतानाही आंदोलकांनी वाहतूक रोखल्याने रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांची धावपळ उडाली. दरम्यान, संतप्त आंदोलकांकडून रस्त्यावर असलेल्या आयशर ट्रक, ऑटो तसेच एका स्कूल व्हॅनची तोडफोड करण्यात आली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे वाहनचालक, नागरिक आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान आंदोलनाला हिंसक वळण लागल्याची माहिती शहरात पसरताच व्यापाऱ्यांमध्येही मोठी घबराट निर्माण झाली. संभाव्य अनुचित प्रकार टाळण्यासाठी अनेक व्यापाऱ्यांनी दुकाने घाईघाईने बंद केली. त्यामुळे काही काळ बाजारपेठेत शुकशुकाट पसरला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने मोठा बंदोबस्त तैनात केला असतानाही अचानक रास्ता रोको आणि वाहनांची तोडफोड झाल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन दिवसेंदिवस तीव्र होत असताना, सोमवारी घडलेल्या या प्रकारामुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. आंदोलकांच्या मागण्यांवर शासनाने तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी होत असतानाच सार्वजनिक रस्ते अडविणे आणि वाहनांची तोडफोड करण्याच्या प्रकारामुळे शहरातील नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. तोडफोड आणि रास्ता रोकोच्या घटनेप्रकरणी पोलिसांकडून पुढील काय कार्यवाही होते, याकडे लक्ष लागले आहे. सध्या शहरातील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिस बंदोबस्त कायम ठेवण्यात आला आहे.






# या जगातला एकमेव देव - बाप

या जगामध्ये असा एक देव आहे, ज्याला प्रसन्न करण्यासाठी कधी हार फुले लागत नाहीत, कधी नवस करावा लागत नाही, कधी उपवास करावा लागत नाही, अनवाणी चालत जावं लागत नाही. त्याच्याकडे काही मागण्याआधीच आपल्या मनातलं त्याला कळतं. आपल्या डोळ्यांत पाणी येण्याआधी त्याला आपल्या वेदनेची जाणीव होते. आपल्या ओठांवर शब्द येण्याआधीच आपली गरज ओळखणारा तो देव म्हणजे बाप...!बाप हा शब्द खुप छोटा आहे; पण त्याच्या मागचा त्याग समुद्रापेक्षाही खोल आहे. लहानपणी आपलं बोट धरून चालायला शिकवणारा बाप, आपण पडल्यावर स्वतःच्या वेदना विसरून आपल्याला उचलुन घेतो तो बाप, त्याचा राग नेहमी आपल्याला दिसतो; पण त्या रागामागची काळजी कधीच दिसत नाही. तो "अभ्यास कर", "वेळेवर घरी ये", "पैसे जपून खर्च कर" असं सांगतो तेव्हा आपल्याला त्याचा कठोरपणा जाणवतो; पण त्या प्रत्येक शब्दामागे आपल्या भविष्याची चिंता दडलेली असते हे कधीच दिसत नाही. आपण एखाद्या वस्तूसाठी हट्ट करतो, तेव्हा तो स्वतःची गरज बाजूला ठेवून ती वस्तू आणतो. आपण आनंदाने ती हातात घेतो; पण ती आणण्यासाठी त्याने काय सोडलं, किती कष्ट केले, किती वेळा स्वतःच्या इच्छेला मुरड घातली, हे आपण कधीच विचारत नाही. बापाचं आयुष्य असंच असतं - स्वतःसाठी कमी आणि मुलांसाठी अधिक. त्याला भूक लागलेली असते,पण तो म्हणतो, "मला भूक नाही." त्याला नवीन कपडे घ्यायचे असतात, पण मुलांच्या फी समोर ती इच्छा छोटी वाटते. त्याला थकवा आलेला असतो, पण घराची जबाबदारी त्याला थांबू देत नाही. तो स्वतःच्या स्वप्नांना मागे ठेवून मुलांच्या स्वप्नांना पुढे नेतो. त्याला मुलाला जग जिंकताना पहायचे असते आणि हेच त्याच्या आयुष्याचं सर्वात मोठं समाधान असतं. विचित्र गोष्ट अशी की, बाप जिवंत असताना आपण त्याच्या प्रेमाची किंमत अनेकदा समजून घेत नाही. त्याचा फोन आला की "नंतर बोलतो" असे म्हणतो. तो "कधी तरी माझ्याजवळ बस" म्हणतो आणि आपण वेळ नसल्याचं सांगतो. आपल्याला वाटतं,तो नेहमीच असणार आहे. पण काळ कोणासाठी थांबत नाही. एक दिवस त्याच्या आवाजातला दम कमी झालेला जाणवतो, पावलांचा वेग कमी होतो, हात थरथरू लागतात आणि आपण अचानक जाणतो—ज्याच्या सावलीत आपण आयुष्यभर सुरक्षित होतो, ती सावली आता हळूहळू दूर जात आहे. आणि मग एक दिवस बातमी येते—"बाबा गेले..." दोन शब्द. पण त्या दोन शब्दांत संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होतं. घर तेच असतं, भिंती त्याच असतात, त्याची खुर्ची तिथेच असते, कपडे कपाटात असतात, चप्पल दाराशी पडलेल्या असतात; फक्त तो नसतो. आणि मग त्या रिकाम्या खुर्चीकडे पाहताना मनाला पहिल्यांदा जाणवतं—आपण किती मोठी गोष्ट गमावली आहे. पूर्वी तो विचारायचा, "कुठे चाललास?", "कधी येणार?", "जेवलास का?" तेव्हा त्याचे प्रश्न त्रासदायक वाटायचे; आता तेच प्रश्न पुन्हा एकदा ऐकण्यासाठी मन आतून तडफडतं. पण प्रश्न विचारणारा माणूसच उरलेला नसतो. मृत्यूनंतर बापासाठी कितीही फुलं वाहिली, कितीही मोठी श्रद्धांजली दिली, कितीही शब्द लिहिले तरी त्याच्या हाताचा स्पर्श परत मिळत नाही. म्हणून बाप जिवंत असेल तर त्याला प्रेम सांगण्यासाठी उद्याची वाट पाहू नका. त्याच्या जवळ बसा. त्याचा हात हातात घ्या. त्याच्या डोळ्यांत पाहून फक्त एवढं म्हणा—"बाबा, तुम्ही माझ्यासाठी खूप केलं." कदाचित तो नेहमीप्रमाणे हसून म्हणेल, "अरे, त्यात काय एवढं?" पण त्या साध्या उत्तरामागे त्याच्या आयुष्यभराचा त्याग लपलेला असेल. बापाला मोठ्या भेट वस्तूंची गरज नसते; त्याला आपल्या मुलाच्या आयुष्यात स्वतःचं स्थान अजूनही आहे, एवढी जाणीव पुरेशी असते. म्हणून देव शोधण्यासाठी दूर जाऊ नका. घरात बाप असेल तर त्याच्या चरणीच तुमचं सर्वात मोठं तीर्थ आहे. देवाला आपण फुलं वाहतो; बापाला मात्र प्रेमाचे दोन शब्द द्यायला हवेत. देवापुढे आपण हात जोडतो; बापाचा हात मात्र जिवंतपणी घट्ट धरायला हवा. कारण देव हरवला तर कदाचित पुन्हा सापडेल; पण बाप एकदा निघून गेला की त्याची जागा जगातील कोणतीही व्यक्ती भरू शकत नाही. मग आयुष्यभर उरते ती त्याची आठवण, त्याचा आवाज, त्याची सावली आणि मनात खोलवर रुतलेली एकच वेदना—"बाबा... एकदा परत या ना... तुमच्याशी अजून खूप काही बोलायचं राहून गेलं आहे."



**प्रा.डॉ.सतिश लिला नामदेव दोडके, ठाणे**